# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१.**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट ३४९-२२ दिनांक २३/११/२०२२

## पत्नीचा खून करुन पळून जाणा-या आरोपीस पकडण्यात गुन्हे शाखा, कक्ष-3 विरार यांना यश.

संतोषभुवन, नालासोपारा पुर्व येथे घरगुती भांडणाच्या कारणावरुन आरोपी नामे राजेश विश्वकर्मा याने त्याची पत्नी संजु अच्छेलाल सरोज वय- ३५ वर्षे हिचा दिनांक १८/११/२०२२ रोजी सकाळी ०७.०० वा. ते दिनांक १९/११/२०२२ रोजी रात्रौ २०.३० वा. या दरम्यान मारहाण करुन तीचा गळा दाबून जीवे ठार मारुन घराचे दरवाजाला लॉक लावून पळून गेला होता. सदरबाबत आरोपीत याचेविरुध्द पेल्हार पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नंबर ९८४/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३०२ प्रमाणे दिनांक २०/११/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून पोलीस उप आयुक्त (गुन्हे), सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष-३ विरार हे सदर गुन्हयातील आरोपीत याचा शोध घेत असतांना तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदार यांचेकडून मिळालेल्या विश्वसनीय बातमीनुसार आरोपीत हा रेल्वे गाडीने त्याचे मुळ गावी वाराणसी, राज्य- उत्तरप्रदेश येथे पळून जात असल्याची बातमी मिळाल्याने गुन्हे शाखा कक्ष-३ चे पथक लागलीच ललितपुर, राज्य- उत्तरप्रदेशकडे रवाना होवून रेल्वे सुरक्षा बल, पोस्टे- ललितपुर, राज्य उत्तरप्रदेश यांचे मदतीने नमुद गुन्हयातील आरोपीत नामे राजेश गयालाल विश्वकर्मा वय- ३२ वर्षे, रा- रुम नं. ०७, महादेव सोसायटी, वलईपाडा रोड, संतोषभुवन, नालासोपारा पुर्व मुळ रा- ग्राम- चुरामणपुर, पोस्टे- भुल्लनपुर, थाना- लोहता, जिल्हा- वाराणसी, राज्य- उत्तरप्रदेश यास ललितपुर, उत्तरप्रदेश येथून ताब्यात घेण्यात आले आहे. नमुद आरोपीतास पुढील कारवाई करीता पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि. नंबर ९८४/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३०२ या गुन्हयात पेल्हार पोलीस ठाणे यांचे ताब्यात देण्यात आले असून त्यास अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.वि.व. पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पेल्हार पोलीस ठाण्याचे वपोनि/ श्री. वसंत लब्दे, गुन्हे शाखा कक्ष -३ चे पो.नि/ प्रमोद बडाख, पोउपनिरी/ शिवाजी खाडे, पो.उपनिरी/ उमेश भागवत, पो.हवा/ अशोक पाटील, पो.हवा/ मुकेश तटकरे, पो.हवा/ सागर बारवकर, पो.हवा/ सचित घेरे, पो.हवा/ शंकर शिंदे, पो.हवा/ मनोज सकपाळ, पो.हवा/ अश्विन पाटील, पो.अं./ राकेश पवार, पो.अं./ सुमित जाधव, मसुब/ प्रविन वानखेडे सर्व नेम- गुन्हे शाखा, कक्ष -३ यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

**-------00000-------**